“ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार दर्शन : एक चिकित्सक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच. डी.

पदवी करिता सादर केलेला संशोधन आराखडा

:: संशोधक ::

सुभाष रघुत्तम मोहुर्ले

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ. पंजाब लक्ष्मणराव शेरे

मराठी विभाग प्रमुख

बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट जि.नांदेड

:: अभ्यास केंद्र ::s

भाषा वाङमय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ. नांदेड

:: शैक्षणिक वर्ष ::

2023

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृ.क्र.
1	प्रस्तावना	1
2	विषय निवडी मागील भूमिका	3
3	संशोधन विषयाचे महत्त्व	4
4	संशोधन विषयाची उदिष्टये	4
5	संशोधन विषयाची गृहितके	5
6	पूर्व संशोधने	5
7	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	6
8	संशोधन पध्दती	6
9	प्रकरण निहाय आराखडा	7
10	प्रकरण पहिले : राष्ट्रसंत तुकोडोजी महाराज: साहित्य संपदा आणि वेगळेपण	7
11	प्रकरण दुसरे : ग्रामगीतेतील सामाजिक व धार्मिक विचार : एक अभ्यास	7
12	प्रकरण तिसरे : ग्रामगीतेतील शैक्षणिक व राजकीय विचार यातून आलेले भाष्य	8
13	प्रकरण चौथे : ग्रामगीतेतील आर्थिक व कृषि विषयक विचार : एक चिंतन	9
14	प्रकरण पाचवे: ग्रामगीतेतील वैचारिक साहित्य मूल्ये	10
15	प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष	10
16	संदर्भ ग्रंथ सूची	11

“राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार दर्शन : एक चिकित्सक अभ्यास ”

❖ **प्रस्तावना** :

मराठी भाषेच्या आरंभ काळात संत साहित्य हे वैशिष्ट्यपूर्ण साहित्य राहिले आहे . महाराष्ट्रातील संतांनी तर मराठी भाषेला श्रीमंती दिली. मराठी माणसाला जगण्याचा दृष्टिकोन व संस्कार दिलेत, अशा या महाराष्ट्रातील थोर संत परंपरेत तुकडोजींचे स्थान आगळे वेगळे आहे. एकूणच संत परंपरेत क्रांतिकारी देशभक्त, साहित्यिक, सर्वधर्म समन्वयक, समाज शिक्षक, प्रवचनकार, कीर्तनकार, शिक्षणतज्ञ,आध्यात्मिक जाणकार व विचारवंत असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे .त्यांनी संत परंपरेला व सामाजिक कार्याला आपल्या लेखणीतून नवविचारांची झळाळी देण्याचे ऐतिहासिक कार्य केलेले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खऱ्या मानवतेचे आदर्श मानबिंदू आहेत . राष्ट्रसंतांनी देशासाठी व देशातील प्रत्येक मानवासाठी परिवर्तन घडवून आणण्यासाठी संपूर्ण आयुष्य झिजविले . त्यांनी १५० हून अधिक ग्रंथ लिहिले आहे . त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी सुरु झालेला लेखन यज्ञ जीवनाच्या अंतापर्यंत सुरूच होता, या यज्ञामुळे तुकडोजींचे गद्य - पद्य साहित्य फार मोठ्या प्रमाणात जगासमोर आले त्यांच्या मराठी पद्य साहित्यात ११० भजन,२१०९ अभंग, १० पोवाडे , ३७६ श्लोक, ५१४९ ओव्या, ४ स्वागत गीते, १७४६ बरखा, ८ प्रार्थना, श्लोक १५५७ सद्विचार, गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचा काव्यमय अनुवाद व संपूर्ण मानवतेला सर्वांगीण उपदेश करणारा “ ग्रामगीता ” हा ग्रंथ , असे विविध प्रकारचे मराठी भाषेत साहित्य प्रकाशित आहे. याशिवाय हिंदी भाषेत सुद्धा त्यांनी लेखन केले आहे ८१८ सुविचार , ६०० मराठी - हिंदी लेख,संदेश,पत्रे,स्फूट लेखन, शंका – समाधान, भागवत प्रवचने,

सत्संग की लहरे, सुधासिंधुकी लहरे अशा विविध साहित्य प्रकारातून त्यांनी विपुल लेखन केले.

तुकडोजींनी एवढे प्रचंड साहित्य आपल्या धावत्या प्रवासात लिहिले असले, तरी मी साहित्यिक आहे, असा दावा त्यांनी कधीच केला नाही . श्रेष्ठ साहित्य कोणते ? या प्रश्नावरून त्यांनी चर्चा केली आहे, त्यांनी साहित्याची व्याख्या " विश्व साक्षातकारातून विश्वकल्याण साधणारे ते साहित्य " अशी केली . ती स्पष्ट करताना लिहितात, " मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही, अफाट जनसागरातून हृदयाच्या गाभाऱ्यातून , अंतरिक उच्चभळीतून साहित्य शिकलो, साहित्याची कल्पना या जनसागरात मिळाली ". या विचारावरून त्यांचे साहित्य हे विचारांना प्राधान्य देणारे आहे , असेच प्रत्ययास येते.

भारत हा खेड्यांचा कृषिप्रधान देश आहे , या देशात सात लाख खेडी आहेत . मात्र नेहमीच तोट्यात येणारी शेती कधी दुष्काळाने तर कधी अतिवृष्टीने पछाडलेला शेतकरी पाहावत नाही . बिघडलेली आर्थिक स्थिती व नैराश्यातून घडणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचे दुष्टचक्र चालूच आहे . त्यात सामाजिक अनिष्ठ रूढी – प्रथा – परंपरा, अज्ञान, अंधकार, जातिवाद, संप्रदायवाद, धर्मभोळेपणा, कर्मकांड, बुवाबाजी, खेड्यापाड्यातील जीवघेणे राजकारण व वाढती बेरोजगारी इत्यादी बाबींचा हाहाकार खेड्यातून माजला आहे.

देशाचा विकास करायचा असेल तर देशातील सर्वात शेवटचा घटक - खेडी विकसित झाली तरच देश विकसित होईल ; असा व्यापक दृष्टिकोन तुकडोजींचा होता . " ग्रामगीता " हा ग्रंथ त्यांनी खेडूतांसाठी लिहिलेला वैचारिक साहित्य ग्रंथ आहे . ग्रामासाठी गीता म्हणजे ग्रामगीता लिहिली असली तरी त्यातील विचार हे समस्त विश्वातील मानवतेसाठी आहेत . त्यात वैश्विकता आहे ; एवढेच नाही तर संपूर्ण प्राणी मात्रांविषयी प्रेम त्यात दडलेले आहे . संपूर्ण विश्वाला मानवता

शिकवणारा हा ग्रंथ आहे . या ग्रंथातील विचारातून राष्ट्रसंत हे सशक्त शेतकरी, सुसंस्कृत राष्ट्र, समानता, मानवतावाद, विश्वबंधुप्रेम, आदर्श ग्राम – राज्य, कर्तव्यदक्ष माणूस घडविण्यासाठी ग्रामगीतेतून सामाजिक, राजकीय, धार्मिक – सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक असे विविधांगी विचार त्यांनी मांडले. राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील विचारबांधणी देशाच्या मजबुतीसाठी, कणखरतेसाठी, बळकटीसाठी आजही उपयोगी पडणारी ऊर्जा आहे . मात्र हा वैचारिक ग्रंथ सामान्य पर्यंत अद्याप पोहोचलेला नाही, तो सर्व सामान्यांपर्यंत पोहोचावा व आदर्श राष्ट्र निर्मितीस आपल्या संशोधन प्रबंधाचा हातभार लागावा, या उद्देशाने संशोधकाने “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार दर्शन : एक चिकित्सक अभ्यास ” या विषयांची निवड केली यासाठी प्रा . डॉ . पंजाब शेरे यांनी याविषयी प्रोत्साहित केले .

❖ **विषय निवडी मागील भूमिका :**

वैचारिक साहित्य लेखनाला एक शिस्त असते. आपल्या विचारांतून परिवर्तन करण्याचा एक ठराविक उद्देश असतो . अशा वैचारिक ग्रंथ वाचनातून प्रभावित होऊन सन २००६ मध्ये एम . फिल् . या पदवीसाठी संशोधनासाठी ‘ ग्रामगीता ’ या ग्रंथाची निवड केली व “ ग्रामगीतेतील साहित्यसृष्टी ” या शीर्षकाखाली संशोधन प्रबंध पूर्ण करून पदवी मिळवली, आणि त्यावेळेस ग्रामगीतेचा अभ्यास करत असताना एक लक्षात आले की ग्रामगीता हा ग्रंथ वाङ्मयीन दृष्टिकोनातून मौल्यवान आहेच, पण त्याचबरोबर तो वैचारिक दृष्टीनेही फार महत्त्वाचा आहे . ग्रामगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजींचे विविधांगी विचार हे विविध अध्यायातून व्यक्त झालेले आहे . ग्रामगीतेचा स्वतंत्ररीत्या वैचारिक दृष्ट्या अभ्यास करून राष्ट्रसंत तुकडोजींच्या विचारांचे वर्गीकरण करून आपण पद्धतशीर विश्लेषण करू शकतो व समाजापुढे मांडू शकतो या उद्देशाने “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार दर्शन : एक चिकित्सक अभ्यास ” असा संशोधनाचा विषय संशोधकाने निवडलेला आहे .

❖ **संशोधन विषयाचे महत्त्व :**

राष्ट्रसंत तुकडोजींनी ग्रामगीतेतून वैचारिक क्रांतीच केली आहे. राष्ट्राच्या उत्थानासाठी त्यांनी तळागाळातील सामान्य माणूस केंद्रबिंदू मानला आहे; त्यांनी लिहिलेल्या ग्रामगीतेचा तो आत्मा आहे . ग्रामीण जीवन तुकडोजींनी जवळून पाहिले गावातील अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी, सुशिक्षित बेरोजगारी, जीवघेणे राजकारण इत्यादी बाबींचा हाहाकार त्यांनी पाहिला समाजातील सर्व अनिष्ट चालीरीतीवर ग्रामगीतेतून प्रहार केले, सर्वधर्मसमभाव असा मानवताधर्म व आदर्श ग्राम - राज्याची संकल्पना मांडली . सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक असे विविधांगी विचार व्यक्त केले. त्यामुळे ग्रामगीता जन्मामागची भूमिका तपासणे व त्याचा वैचारिकदृष्ट्या सखोल अभ्यास करून ग्रामीण - खेडूत सामान्य माणसापर्यंत त्यांचे विचार पोहोचवल्यास सामान्य माणसाला दिशा मिळेल ही संशोधनाची उपयोगिता आहे. त्याबरोबरच ग्रामगीतेच्या अभ्यासाला चालना मिळेल व ग्रामगीतेसंबंधी नवसमीक्षेचे स्वरूपही पुढे येईल .

❖ **संशोधन विषयाची उद्दिष्टे :**

१. वैचारिक साहित्याच्या स्वरूप विशेषांचा शोध घेणे .

२. राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या जीवनातील अनुभव - संघर्षाचा शोध घेणे .

३. ग्रामगीता जन्म मागची भूमिका स्पष्ट करणे .

४. ग्रामगीतेतील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक विचारांचा शोध घेणे व त्याचे विश्लेषण करणे.

५. ग्रामगीता या वैचारिक साहित्य ग्रंथातील वैचारिक साहित्याचे विशेष, सामर्थ्य व मर्यादांचा शोध घेणे .

❖ संशोधन विषयाची गृहितके :

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ‘ ग्रामगीता ’ या वैचारिक ग्रंथातून समाज परिवर्तनाचे मूल्य विचार व्यक्त झाले आहे .

२) ‘ ग्रामगीता ’ या वैचारिक ग्रंथावर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत गाडगे महाराज, कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, फुले, शाहू, आंबेडकर, यांच्या विचारांचा प्रभावातून ग्रामगीतेतील विचार व्यक्त केले आहे .

३) ग्रामगीता या वैचारिक ग्रंथाला व्यापक आणि सखोल चिंतनाची बैठक लाभली आहे

४) ग्रामगीतेतून अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा, धर्मभोळेपणा, कर्मकांड, बुवाबाजी, जातिवाद, संप्रदायवाद, धर्मवाद, गलिच्छ राजकारण, यांना झुगारून देऊन समानता, मानवताधर्म, सर्वधर्मसमभाव, मूल्यशिक्षण, विश्वबंधु प्रेम , इत्यादी मूल्यांची रुजवणूक केली आहे .

५) त्यासाठीच राष्ट्रसंत तुकडोजींनी ग्रामगीतेतून सामाजिक , राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक अशा विविधांगी विचारांची मांडणी केली आहे .

❖ पूर्व संशोधने :

“ ग्रामगीतेचा लोकतत्वीय अभ्यास ” या विषयावर डॉ . माधव जाधव यांनी ग्रामगीतेचा लोकसाहित्य दृष्टीने अभ्यास केला आहे , त्यात त्यांनी ग्रामगीतातील लोक तत्वांचा शोध घेतला . त्याचबरोबर डॉ . केशव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप कठाळू शृंगारपुतळे यांनी “ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता : एक चिकित्सक अभ्यास ” या विषयावर संशोधन केले . आणि या संशोधनात राष्ट्रसंत तुकडोजी यांचे व्यक्तित्त्व व कर्तृत्व आणि ग्रामगीतेतील वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेतला आहे.

सदरील संशोधकाने ग्रामगीतेचा वैचारिक दृष्ट्या अभ्यास करण्यासाठी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार दर्शन : एक चिकित्सक अभ्यास " हा विषय निवडला आहे .

❖ **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

राष्ट्रसंत तुकडोजींनी सामाजिक उत्थानासाठी त्यांनी 150 हून जास्त ग्रंथ – पुस्तके लिहिली . त्यांनी मराठी व हिंदी भाषेमध्ये विपुल लेखन केले . ग्रामगीता लेखना मागची राष्ट्रसंत तुकडोजींची भूमिका स्पष्ट करणे व ग्रामगीतेतील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक विचारांचा शोध घेऊन त्यांचे वर्गीकरण करणे व त्यांचे विश्लेषण करणे. व ग्रामगीते वैचारिक साहित्याची मूल्ये यांचा शोध घेणे ही संशोधन विषयाची व्याप्ती आहे. केवळ ग्रामगीतेचा वैचारिक दृष्ट्या अभ्यास करणे ही संशोधन विषयाची मर्यादा आहे.

❖ **संशोधन** पध्दती :

प्रस्तुत शोधप्रबंधात राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या ग्रामगीतेचा वैचारिक दृष्टया अभ्यास केला जाणार आहे . प्रस्तुत संशोधनासाठी आधारभूत सामग्री म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मराठी व हिंदी काव्यसंग्रह – अभंग, ग्रामगीता, आत्मकथा, प्रवासवर्णन, ध्वनिमुद्रिका भजन आणि भाषणे, संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे, शब्दकोश, संज्ञा, संकल्पना कोश, आणि इंटरनेट यांचा उपयोग केला जाणार आहे इतर समीक्षकांची परीक्षणे, मते विचारात घेतली जाणार त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार, ग्रामगीतेच्या आशयाच्या वैविध्यपूर्ण वर्गीकरणासाठी विश्लेषण व तुलनात्मक पद्धतीचा आवश्यक तिथे उपयोग केला जाणार , विषयाला न्याय मिळवा यासाठी ग्रामगीतेचा सख्वोल अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय, चरित्रात्मक, आस्वादक, मानसशास्त्रीय, मार्क्सवादी, आंबेडकरवादी अशा विभिन्न समिक्षा पद्धतींचा वापर करावा लागेल व अंतिमतः

निष्कर्ष मांडले जातील प्रस्तुत शोधनिबंधाची एकूण सहा प्रकरणात विभागणी केली आहे ते पुढील प्रमाणे .

❖ **प्रकरण निहाय आराखडा :**

प्रकरण पहिले

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : साहित्यसंपदा आणि वेगळेपण

- जन्म व बालपण
- जीवन पद्धती
- तत्कालीन परिस्थिती
- चळवळ येथील कार्य
- प्रेरणा व प्रभाव
- साहित्यिक योगदान
- साहित्य विषयक दृष्टिकोन
- ग्रामगीतेचा परिचय
- ग्रामगीता लेखना मागची भूमिका
- ग्रामगीतेचे वेगळेपण

प्रकरण दुसरे

ग्रामगीतेतील सामाजिक व धार्मिक विचार : एक अभ्यास

- आदर्श समाजाची संकल्पना
- समता
- विश्वबंधु प्रेम
- महिलोन्नती

- दलित सेवा
- ग्रामस्वराज्य
- ग्रामकुटुंब ते विश्वकुटुंब
- देव व धर्म संकल्पना
- धर्माचे स्वरूप
- सर्वधर्मसमभाव
- मानवता धर्म
- प्रारब्ध वाद व प्रयत्नवाद
- वैज्ञानिक दृष्टिकोन

प्रकरण तिसरे

ग्रामगीतेतील शैक्षणिक व राजकीय विचार : यावरील भाष्य

- शिक्षणाची संकल्पना
- शील चारित्र्य व सेवाभाव हीच साक्षरतेची कसोटी
- शिक्षणाचा मूलमंत्र स्वावलंबन
- शिक्षणातून व्यक्तिमत्व विकास
- कलाशिक्षण
- स्त्री शिक्षण
- शिक्षण आणि शिक्षक
- शिक्षकांचे कर्तव्य
- प्राथमिक शिक्षकाचे सामर्थ्य
- विविधांगी अभ्यासक्रम

- मूल्यशिक्षण
- लोकशाहीची व्याख्या
- लोकशाहीचा अंगीकार व भांडवलशाहीचा विरोध
- निवडणूक पद्धतीतील दोष
- मतदान पद्धती
- मतदान कुणा करणार ?
- निवडणूक तत्वावर आधारित असावी
- आजचे पुढारी
- पुढाऱ्यांची लक्षणे
- ग्रामराज्य हेच रामराज्य
- भ्रष्टाचार निर्मूलन

प्रकरण चौथे

ग्रामगीतेतील आर्थिक व कृषी विषयक विचार : एक चिंतन

- श्रमप्रतिष्ठा
- ग्राम स्वच्छतेतून कृषीउन्नती
- शेतीसाठी भांडवल निर्मिती
- बचतीतून भांडवल निर्मिती
- शेती व गोरक्षण
- कृषी शिक्षण
- जलसिंचन
- स्वदेशींचा वापर
- ग्राम निर्माण कलेतून उद्योगांचा विकास

- उद्योग शिक्षण वर्ग

प्रकरण पाचवे

ग्रामगीतेतील वैचारिक साहित्य मूल्ये

- मानवता
- सखोल चिंतन
- बुद्धीप्रामाण्यवाद
- प्रभावी युक्तिवाद
- तार्किकता
- वस्तुनिष्ठपणा
- परखड मांडणी
- भाषाशैली

प्रकरण सहावे

उपसंहार व निष्कर्ष

या प्रकरणात ग्रामगीतेचे वैचारिक मूल्यमापन करून चिकित्सक अभ्यासांती आढळून आलेल्या निष्कर्षाची मांडणी करावयाची आहे .

अशाप्रकारे सहा प्रकरणांमधून शोधप्रबंधाचे स्वरूप आकाराला येणार आहे प्रबंधाच्या शेवटी परिशिष्टे व संदर्भाची सूची दिली जाणार आहे .

❖ **संदर्भ ग्रंथ सूची:**

१. सुदाम सावरकर (संपादक) ग्रामगीता प्रकाशक - श्री गुरुदेव ग्रा . प्रतिष्ठान नवमावृत्ती १९९१

२. रघुनाथ कडवे, राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय खंड १ ते १० , प्रकाशक – मो . रा . पुनसे, प्रथम आवृत्ती २०००

३. रघुनाथ कडवे , मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी , प्रकाशक - सौ सुशीलाताई कडवे, षष्टमावृत्ती २००६

४. रघुनाथ कडवे, थोर साहित्यकार प्रकाशक - अमोल कडवे, प्रथम आवृत्ती २००३

५. राष्ट्रसंत तुकडोजी, विश्वशांतीयोग, प्रकाशक - लक्ष्मणभाऊ नारखेडे, प्रथम आवृत्ती २०००

६. विठ्ठलराव घाटोळ, नवयुगाचा निर्माता , प्रकाशक - संध्या राजेश बाहे, प्रथम आवृत्ती २००८

७. श्री अरविंद वा. कुलकर्णी, साहित्यविचार , प्रकाशक - अरुण पारगावकर द्वितीय आवृत्ती १९९७

८. बाबा मोहोड (संपादक) राष्ट्रसंतांची भाषणे , प्रकाशक - मो . रा . पुनसे , चौथी आवृत्ती २०००

९. म . रा . शि . मं . पुणे , मूल्यशिक्षण , प्रकाशक - नेमचंद्र शितोळे , द्वितीया वृत्ती १९९९

१०. रा . मो बेलूरकर , ग्रामगीता अविष्का ,र प्रकाशक - माणिकदास बेलूरकर प्रथम आवृत्ती २००४

११. रघुनाथ कडवे , श्री गुरुदेव (मासिक) प्रकाशक - विजय मंथनवार

१२. डॉ . बाळासाहेब जाधव (संपादक) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : व्यक्ती आणि वाङ्मय (स्मरणिका) प्रकाशक श्री शिवाजी महाविद्यालय परभणी, प्रथम आवृत्ती २०१३

संशोधक

सुभाष रघुतम मोहुर्ले

मार्गदर्शक

प्रा.डॉ. पंजाब लक्ष्मणराव शेरे
मराठी विभाग प्रमुख
बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट जि.नांदेड